## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७७९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/११/२०१७

**१) मोटार सायकल स्लिप होवुन महिला खाली पडुन डोक्याला मार लागल्याने औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु :—**

दिनांक २१/१०/२०१७ चे १५.३० वाजता दरम्यान यातील आरोपीचे मोटार सायकलने मृतक डब्बलसिट जात असता यातील आरोपी मोटार सायकलने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही हयगयीने चालवुन स्लिप होवुन मृतक पार्वताबाई बिसराम सिडाम वय ७० वर्ष, रा. खापा ही खाली पडुन तीचे डोक्याला मार लागल्याने तिला औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो.स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. घरडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३०४(अ) भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. थेरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २१/११/२०१७ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही शाळेत जातो म्हणुन नेहमी प्रमाणे शाळेत जाते म्हणुन घरुन निघुन गेली सायंकाळ पर्यत घरी परत आली नाही तिचा शोध घेतला असता मिळुन आली नाही नसल्याने तिला कोणीतरी अज्ञात आरोपी इसमाने पळवुन नेले असावे असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट व जन्माचे प्रमाण पत्रावरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३६३ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन भांडण व अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २२/११/२०१७ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी वामन किसन वाहाणे वय ५७ वर्ष, रा. पाचगाव हा संडास कडे जात असतांनी यातील तिन्ही आरोपीतांनी संगनमत करुन 'तु रात्री मला का मारला' असे बोलुन भांडण, अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन थापड बुक्यांनी मारहान केली व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २९४,५०६,३२३,३४ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. खोंडे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन भांडण शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २१/११/२०१७ चे २०.३० ते २१.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अमित हेसराज वाघमारे वय ३० वर्ष, रा. पाचगाव हा त्याचा मालक (ठेकेदार) याचे पिकअप वाहन वरठी येथुन पाचगाव येथे घेवुन गेला तेथे ऊभा होता तेव्हा यातील आरोपीतांनी संगनमत करुन ही गाडी कशी का आनलास असे बोलुन भांडण, अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन थापड बुक्यांनी मारहान करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २९४,५०६,३२३,३४ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. खोंडे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**५) शेतामध्ये ईलेक्ट्रीक करंट लावुन दोन म्हशी मरण पावल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २१+२२/११/२०१७ चे १२.०० ते १५.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी गोपाल भोजराम कुंभरे वय २२ वर्ष, रा. मिरेगाव यांच्या दोन म्हशी किंमती अंदाजे किंमती ६०,०००/–रु. चे कोणत्यातरी अज्ञात आरोपी इसमाने शेतामध्ये ईलेक्ट्रीक करंट लावुन दोन म्हशी मरण पावल्याने त्याचे नुकसान केल्याने फिर्यादी गोपाल भोजराम कुंभरे वय २२ वर्ष, रा. मिरेगांव यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ४२९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**६) ट्रकची महावितरनाचे लोखंडी पोलला धडक दिल्याने गार्डीग तार तुटुन विद्युत कंपनीचे मालमत्तेचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २२/११/२०१७ चे ०४.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक मोहाडी तुमसर रोडने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन महावितरनाचे रोडाचे बाजुला असलेले ११ केव्ही वाहीनीचे लोखंडी पोलला मोहाडी शिवार येथे धडक देवुन पोलचे तनावाचे गार्डीग तार तोडुन ३०,०००/–रु. चे विद्युत कंम्पनीचे मालमत्तेचे नुकसान केल्याने फिर्यादी विनोद मनोहर मस्केवय ३४ वर्ष, रा. मोहाडी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९ भा.दं.वी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**७) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक २२/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, मोहाडी, तुमसर, सिहोरा, गोबरवाही व पवनी येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४५ लिटर हातभट्टी दारू किंमती ३,४००/–रू. व ४ लिटर ४१० मिली लिटर देशी दारु किंमती १२७४/–रु. किंमती ४६७४/–रु. तसेच जुगारातुन किंमती ७७०/–रु असा एकुण किंमती ५,४४४/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**(मपोउपनी. प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.